


# कुटुंबनियोजन–स्त्रीमुक्तीसाठी

आज सेंटरवर जायचा खूपच कंटाळा आला होता. सारखे रोजचेच काम नकोसे झाले होते. सेंटरवर पोहोचते तोच सिस्टरनी सांगितले की एका पेशंटचा फॉर्म भरायचा आहे. झाले. लगेच कामाला सुरुवात झाली. मी हातात फॉर्म घेतला व सुरुवात केली. प्रथम तिचे नाव विचारले?

तिचे नाव होते शकुंतला कचरु पंडीत. नंतर नवऱ्याचे नाव लिहून झाले. दोघांचे वय शिक्षण, व्यवसाय इत्यादी रकाने भरून झाले. पुढचा प्रश्न होता. बाई तुला मुले किती ?–ती म्हणाली " एक मुलगा " इतका वेळ शांतपणे खाली बघून फॉर्म भरत असलेली मी चमकून वर बघितले. साहजिकच मी तिला विचारले की तू एका मुलावर नसबंदी शस्त्रक्रिया करण्यास कशी काय तयार झालीस? तुझा मुलगा किती वर्षाचा आहे? तुला माहित आहे ना ? की ह्या ऑपरेशन नंतर तुला मुल होणार नाही हे.

माझ्या ह्या प्रश्नाच्या भडीमाराला तिने दिलेले उत्तर ऐकून मी सर्दच झाले. ती सांगू लागली की, सध्या मी माझ्या आईकडे राहाते. मुलगा शाळेत सहावीत शिकत आहे. माझ्या नवऱ्याने दुसरी बायको केली आहे. तिलाही मुले आहेत. पण माझा नवरा माझ्याकडे कधीमधी येतोच आणि त्या संबंधातूनच मला हे दिवस गेलेत. असे असले तरी हा मला संभाळत मात्र नाही. मग या मुलाला जन्माला घालून काय करू ? त्यापेक्षां आहे त्याच माझ्या मुलाला व्यवस्थित वाढवून शिकवून मोठा केला तर तो माझे पांग फेडेल,

तिचा फॉर्म भरून झाला होता. ऑपरेशनही उद्या होईल. कायद्याने ती मोकळी होईल. पण प्रश्न येतो तो सारे काही सहन करायचे ते स्त्रीनेच का ?

हिच्या सारख्या कितीतरी अशिक्षित स्त्रिया या समाजात आहेत. ज्या जन्मल्या त्या मोलमजुरी करणाऱ्या स्त्रियांच्या पोटी आणि जगतात तेही मोलमजूरी करूनच. म्हणूनच त्यांचे अनेक प्रश्न आहेत ! 'नवरा' नामक प्राण्याला विरोध करणे त्यांना जमत नाही. जेव्हा तो घरी येईल, ज्या अवस्थेत येईल तेव्हा त्या अवस्थेत त्याला सामोरे जाणे व त्याचे सारे जुलूम निमूटपणे सहन करणे क्रमप्राप्तच ठरते. जे वाट्याला येईल ते जीवन सोशिकतेने जगणाऱ्या या बायकांवर अन्याय होतोय हे जाणवत असतानाही नवऱ्याला असे नेहमी शरण जाऊन कसे भागणार. या सर्वांनी एकत्र येऊन संघटना करणे जरूर आहे. घरात सोसाव्या लागणाऱ्या या अन्यायाविरुद्ध उभे राहून नवरेशाहीला विरोध केला पाहिजे. कुठेतरी नाही म्हणायला शिकलेच पाहिजे. हिच्या सारख्या अनेक केसेस आमच्या सेंटरवर येतात. त्यातून त्यांची मुक्तताही केली जाते. कोणाला नवऱ्याने अजिबात टाकून दिलेले असते तर कोणाच्या पदरी एखादे मूल असते व नवऱ्याने सोडून दिले म्हणून ह्या बायका आईवडिलांच्या आश्रयाने रहात असतात.

समाजातील इतर पुरुष त्यांच्याकडे चांगल्या नजरेने पाहतात असे नाही. सहानुभूतीच्या नावाखाली तिथे वासनेचे भूत लपलेले असते. स्त्रीत्व ही एक महान शक्ती आहे. भारतीय संस्कृतीत स्त्रिला मानाचे स्थान देणारे आम्ही तिचा उगाचच नको तितका उदोउदो करीत असतो. पण प्रत्यक्षात मात्र पदोपदी तिचा अपमान केला जातो. हे सर्व विदारक, सत्य पाहिल्यानंतर मला प्रश्न पडतो तो म्हणजे स्त्री देवते .खरंच तू मुक्त आहेस का ? नाहीतर तुला या मुक्तीसंग्रामात भाग घ्यावाच लागेल.

– विजया महाजन